Maya CARE Foundation
The next best thing to family

# माया केअर फाऊंडेशन

News Letter

**वार्तापत्र**

वर्ष : १ ले अंक : १ ला
ऑक्टोबर-डिसेंबर २०२१
केवळ खाजगी वितरणासाठी विनामूल्य

## माया केअर बद्दल थोडेसे ....

दीर्घायुष्य मिळणे ही सर्वांचीच आंतरिक इच्छा असते .भारतीय संस्कृतीत प्राचीन काळापासून वृद्ध लोकांना आदर,सन्मान ,आणि कुटुंबातील महत्वाचे स्थान दिले गेले आहे. वृद्धत्व हे मानवी विकासाच्या टप्प्यांपैकी एक महत्वाचा टप्पा मानला जातो, ज्यात व्यक्ती त्यांच्या दीर्घ अनुभवातून परीपक्व झालेल्या असतात आणि त्यांना शहाणपणा आलेला असतो तसेच आर्थिक व सामाजिक स्थिरता आलेली असते .

परंतु आता जमाना बदलला आहे. अनेक कारणांमुळे आता काही घरात वृद्ध माणसांची उपयुक्तता संपलेली असून वृद्ध माणसांची अडचण झालेली आहे . दोन पिढ्यातील अंतर,विभक्त कुटुंब पद्धती, पुरेशा जागेचा अभाव, मुलांचे परगावी अथवा परदेशी स्थलांतर ,आर्थिक भार इत्यादी कारणांमुळे हे झाले आहे. माणूस वृद्ध झाला कि डोळ्यांचे आजार सुरु होतात, कानांना कमी ऐकू येऊ लागते, शरीरावर सुरकुत्या पडू लागतात, काठीच्या आधाराशिवाय चालणे कठीण होते. डायबेटीस, उच्च रक्तदाब असे आजार सुरु होतात.

याबाबत वृद्धांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून सौ मंजिरी गोखले जोशी व श्री अभय जोशी यांनी २००९ साली ‘मायाकेअर ‘या संस्थेची स्थापना केली .एकट्या दुकट्या राहणाऱ्या तसेच शारीरिकदृष्ट्या अपंग असणाऱ्या वृद्धांना मदत करणारी हि संस्था आहे . अशा वृद्धांना आवश्यक ते किराणा सामान आणून देणे, औषधे आणून देणे ,त्यांचे चंक्स बँकेत जाऊन भरणे, बँकेतून त्यांचे पैसे काढून आणणे, त्यांच्या मुदत ठेवींचे रिन्यूअल करणे ,त्यांना डॉक्टरकडे घेऊन जाणे आणि परत घरी पोहचविणे, त्यांना बस स्टेशन रेल्वे स्टेशन विमानतळ येथे पोहचविणे किंवा प्रवास करून आल्यावर त्यांच्या घरी पोहचविणे, हॉस्पिटल मध्ये सोबत करणे, वृद्धांना पुस्तके, वर्तमानपत्रे ,धार्मिक पुस्तके वाचून दाखविणे तसेच सगणक आणि स्मार्ट फोनच्या वापराबद्दल जुजबी माहिती देणे इत्यादी कामे मायाकेअरचे स्वयंसेवक करतात.विशेष म्हणजे हि सेवा पूर्णपणे मोफत आहे. कोणतीही रक्कम यासाठी आकारली जात नाही .

मायाकेअरच्या स्वयंसेवकांना फोटो ओळखपत्रे दिलेली असून शक्यतोवर घरातील बाहेरच्या खोलीतच थांबून सर्व कामे करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत आणि त्यांच्या कामाबद्दल अनेक उत्तमोत्तम प्रतिक्रिया लोकाकडून मिळालेल्या आहेत. गेल्यावर्षी कोविडच्या साथीत आमच्या संस्थेने वृद्धाश्रम, सार्वजनिक सेवेतील कर्मचारी, रिक्षाचालक, सफाई कर्मचारी, टपाल व बँक कर्मचारी याना मिळून सुमारे चाळीस हजार मास्क मोफत वाटले आहेत. तसेच लसीकरण मोहिमेत भाग घेऊन वृध्दांची अपॉईंटमेंट घेणे, त्यांना लसीकरण केंद्रावर घेऊन जाणे, लसीकरण करण्यासाठी मदत करणे, परत घरी आणून सोडणे, त्याचा दाखला मिळवून देणे अशी कामे आमच्या स्वयंसेवकांनी केली आहेत.
दोन हजार पेक्षा जास्त वृध्दांना आमच्या संस्थेने लसीकरणात मदत केली. याशिवाय या कामांसाठी आम्ही १०० पेक्षा जास्त दिव्यांग तरुण तरुणीची मदत घेऊन त्यांना रोजगार उपलब्ध करुन दिला आहे.

सर्वप्रथम पुणे शहरात सुरु झालेली हि चळवळ आता मुंबई, कोहापूर, नाशिक, औरंगाबाद, सांगली, सोलापूर, अहमदनगर, नंदुरबार, बुलढाणा, अकोला, जळगाव, अमरावती, या गावात तसेच महाराष्ट्राबाहेर गोहाटी, जालंदर, उदयपूर, भोपाळ, जोधपूर, बडोदा, अहमदाबाद, चेन्नई, त्रिची व हैद्राबाद पर्यंत पोहचलेली आहे.
आमच्या टीमचा आम्हाला अभिमान वाटतो.

A letter received from Mrs Shilpa resident of UK who is Daughter of Shashikant Joshi R/O Athashre Baner who passed away during pandemic and our volunteer Mr Sandeep Nerkar made all the arrangements of his final journey and our another lady volunteer Mrs Manik Vaishampayan gave the moral support to his family.


A heartfelt thank you to you, Maya care team, both volunteers
Mr Sandip Nerkar and Maniktai !!
They had done brilliant job when my dad passed away.Their quick and timely visit as well as help could make it possible to see my dad's final Journey and relived so much pressure off for my mum, as Maniktai being there and afterwards for few months to relieve get grief ,supports her emotionally till she comes to term with the reality.

I can not express in words how supported relived I felt to get that support for my parents(in the last stage of illness ) which was stressful time in pandemic.
It's so much crucial to acknowledge volunteers contribution and let them know that they are valued.

Last but not least May God bless both of you to continue this selfless noble work to human mankind selflessly serving to humanity for greater cause!!
And one day I can proudly say that Maya care will grow sky high and spreads in all parts of India and in UK bcoz of the amazing work you all are doing !!

**- Mrs. Shilpa Shashikant Joshi**

# ।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।



## श्रीमती विद्याताई गोखले

**माया केअर संचालिका**

**मृत्यु : दि .२० एप्रिल २०२१**

**अशोक नारायण फडणीस**
**विलेपार्ले मुंबई**

"सकाळी श्री मकरंद निमोणकरांचा फोन आला. माया केअर विषयी काही लिहावं असं सुचवत होते. मन साहजिकच भुतकाळात गेले. मायाकेअर या संस्थेविषयी लिहिणे म्हणजे आमच्या शरद या अपंग बंधूंची आठवण या संबंधीच्या इतर अनेक गोष्टींची मनात दाटी झाली.

"भोगले जे दु:ख त्याला सुख म्हणावे लागले "या काव्यपंक्तींची आठवण करुन देणाऱ्या आयुष्य भोगलेल्या व १४ व्या वर्षी अपंगत्व आलेल्या शरदला त्याच्या वयाच्या साधारण ५४ व्या वर्षी मुख्यत्वेकरुन अपंग म्हणून २००४ च्या सुमारास पुण्यातील निवारा या वृध्दाश्रमात प्रवेश मिळाला त्याआधी १९८६ साली झालेल्या आमच्या वडिलांच्या निधनानंतर महाराष्ट्रातील काही वृध्दाश्रमात (त्यात बाबा आमटे यांचे आनंदवनसुध्दा धरुन) राहण्याचा त्याचा व त्या निमित्ताने आमचा परिचय झाला होता. त्या सर्व आश्रमाच्या पार्श्वभुमीवर निवारा आम्हा मुंबईतील वडील बंधूंना मनापासून भावला. साधारण सतत १० वर्षे एकच आश्रमात राहून शरदही रुळला. परंतु आमच्या दृष्टीने एक गोष्ट खटकणारी होती. विस्तीर्ण आवार व व्हील चेअर असूनही त्याला नियमित खोलीबाहेर फिरविले जात नव्हते आणि अचानक साधारण २०१४ साली लोकसत्तेच्या चतुरंग पुरवणीत मायाकेअर संस्थेविषयी लिहिलेला लेख माझ्या वाचनात आला.

काहीही वेळ न घालवता मी लेखात शेवटी दिलेल्या मोबाईलवर फोन करुन संपर्क साधला व म्हणून श्री मकरंद - निमोणकर भेटतील असे समजले ठरविल्याप्रमाणे मी मुंबईहून निघालो व निवारा संस्थेच्या कार्यालयाबाहेर मी निमोणकरांना भेटलो मागे वळून पाहता ही भेट म्हणजे शरद व आम्हा बंधूंच्या आयुष्यात एक टर्निंग पॉईंट असे वाटणारी होती. आम्ही तीन वडील बंधू सत्तरी पार केलेले व कायम मुंबईत राहिलेले व चौथा बंधु परदेशात आम्हाला शरदकडे नियमितपणे भेट द्यायला व त्याच्याशी संवाद साधायल कोणीतरी पुण्यातील व्यक्ती हवी होती. श्री निमोणकर नुकतेच सरकारी सेवेतून निवृत्त झाले होते त्यांनी शरदला भेटण्याचे काम नियमितपणे सुरु केले व आम्हाला खूप मदत झाली.

आता निमोणकर या व्यक्तीविषयी, मायाकेअर फाउंडेशन या संस्थेच्या नावाची माया व केअर या दोघांचा मुर्तिमंत अविष्कार म्हणजेच निमोणकर. २०१४ ते २०१९ साली शरदचे निधन होईपर्यंत शरदच्या संदर्भात जे जे शक्य होईल ते काम करायला सुरुवात केली त्यांच्या दैनंदिन गरजेसाठी बाहेरुन वस्तू आणणे, त्याला बाहेर आवारात फिरविणे, त्याशिवाय आवारात होणाऱ्या काही करमणुकीच्या कार्यक्रमास नेणे वगैरे गोष्टी आल्या. काही दिवसातच शरद व निमोणकर यांच्यामध्ये एक प्रेमळ नाते निर्माण झाले. आम्हीही निश्चित झालो. एप्रिल २०१९ च्या सुमारास त्याला पुण्यातील उन्हाळ्याचा खूप त्रास होऊन ताप आला त्याचे औषधांनी काबूत ठेवलेले मानसिक दुखणे बळावले. पूना हॉस्पिटल मधून डॉक्टर वाटवे यांच्या मार्गदर्शनाखाली तो काही दिवस हॉस्पिटलमध्ये होता. तेथेही श्री निमोणकर त्याला भेटत राहिले. त्याच्या अवस्थेत सुधार होण्याची चिन्हे न दिसल्याने डॉक्टर वाटवे यांच्या सूचनेवरून "तपस केअर" या संस्थेत हलविले निमोणकरांच्या निवासस्थाना-पासून बरेच लांब असलेल्या तपसमध्ये सुध्दा निमोणकर शरदला भेटत होते. याचवेळी वाढलेल्या हॉस्पिटलच्या खर्चासाठी मोठ्या रकमा मी श्री निमोणकरांना नि:शंक देत होतो. त्याचा त्यांनी चोख हिशोब दिला.

शेवटी १६ जुलै २०१९ रोजी तपसमध्येच त्याचे निधन झाले. त्याचवेळी अंत्यविधीला आम्ही जवळचे पुरुष नातेवाईक सोडले तर फक्त निमोणकर पती पत्नी हजर होते इतके आमच्या कुटुंबाविषयी व विशेषत: शरदविषयी वाटणारे जिव्हाळ्याचे संबंध वनिर्माण झाले. हे केवळ निमोणकरांमुळे आमच्या सख्ख्या भावांच्यापेक्षा अधिक प्रेमाने शरदचे करणारी श्री निमोणकर हि व्यक्ती आमच्या सर्वांच्या संबंधात आली हे आमचे व शरदचे भाग्य म्हणावे लागेल. त्यांच्यामुळे शरदची शेवटची काही वर्षे अपंगत्व सुसह्य करण्यास मदत करणारी गेली हे नक्की आणि परत हि सर्व सेवा करताना कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न करता श्री निमोणकर यांच्यासारखे स्वयंसेवक लाभलेली मायाकेअर फौंडेशन हि संस्था अशा स्वयंसेवकांच्या मदतीने उज्वल भविष्याची वाटचाल करेल याविषयी माझ्या मनात तिळमात्र शंका नाही.

**अशोक नारायण फडणीस**
**विलेपार्ले मुंबई**
**९७६९८५८५१० (मो.)**

**प्रा.सुधाकर कुलकर्णी**
पौड रोड, कोथरुड
पुणे - ४११०३८

मी भुसावळ येथील महाविद्यातीलयांत कॉमर्सचा विभाग प्रमुख म्हणून ३५ वर्षे नोकरी केली आणि स्वेच्छा निवृती स्विकारली व २००1 साली पुण्यात स्थाईक झालो.

माझ्या वयाच्या ३५ व्या वर्षी मला अंधत्व आले त्यानंतरही मी कॉलेजमध्ये अध्यापनाचे काम करीत होतो. माझी पत्नी २००५ साली वारल्यावर मी पुणे येथे एकटाच रहात आहे. श्री. जयराम जोशी यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेऊन सुगम संगीताचे कार्यक्रम सुरु केले. आत्तापर्यंत मी १७५ कार्यक्रम केल असुन सुमारे एक लाखापेक्षा जास्त लोकांनी माझे कार्यक्रम ऐकले आहेत. त्यामुळे मला "कोथरुड भूषण" हा पुरस्कार देण्यात आला आहे.

दैनिक लोकसत्ता मध्ये माधुरी ताम्हाणे यांचा मायाकेअर या संस्थेबद्दलचा एक लेख माझ्या वाचनात आला आणि त्या लेखात दिलेल्या फोन नंबरवर मी संपर्क केला त्यानुसार श्री भडकमकर हे एक ज्येष्ठ स्वयंसेवक माझ्याकडे येत होते ते आठवड्यातून तीन दिवस मला वृत्तपत्रे वाचून दाखवीत होते पुढे ते अधिकच ज्येष्ठ झाल्याने त्यांचे ऐवजी श्री नातू नावाचे स्वयंसेवक येत होते त्यानंतर श्री विद्याधर जोशी येऊ लागले. ते वृत्तपत्र वाचून दाखवितात, बँकेतून पैसे काढून आणून देतात, तसेच बँकांची इतर कामे फिक्स्ड डिपॉझिट रिन्युअल करणे वगैरे कामे करतात, तसेच किराणामाल, औषधे, भाजीफळे इ. जाण्यासाठी मला बरोबर घेऊन जातात. ते बँकेतून अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झाले असल्याने आर्थिक बाबतीत त्यांचा सल्ला फायदेशीर ठरतो. आमच्या संगीताच्या कार्यक्रमात ते प्रभावी निवेदकाची भूमिका पार पाडतात. माझ्याबरोबर ते सपत्नीक गोंदवले येथेही आले होते.

माया केअर संस्थेची स्थापना करुना संस्थापकांनी अत्यंत मोलाचे काम केले आहे आणि माझ्यासारख्या ज्येष्ठ नागरिकांचे जीवन सुसह्य केले आहे. अशा संस्थेला स्वयंसेवक व लाभार्थी यांनी जमेल तशी आर्थीक मदत मिळवून देऊन संस्थापकांचाभार हलका करावा व त्यांचे काम महाराष्ट्रभर चालावे अशी माझी इच्छा आहे.

**प्रा.सुधाकर कुलकर्णी**
पौड रोड, कोथरुड
पुणे - ४११०३८
मो.९३५९७९२५९१

**मायाकेअरच्या**
**पुढील वाटचालीसाठी**
**मनापासून शुभेच्छा.**

संजय कुलकर्णी,स्वयंसेवक
कोल्हापूर

३१ ऑक्टोबर २०२० ला मी कंपनीच्या सेवेतुन मुक्त झालो. नोकरी अजुन ४ वर्ष होती, पण कंपनीची परिस्थिती फारच खराब असल्यामुळे निर्णय घ्यावा लागला. मनाशी मी ठरवले की आता उर्वरीत आयुष्य फार छान पैकी जगायचे म्हणजे ज्या गोष्टी आपल्याला पूर्वी करता आल्या नाहीत त्या पूर्ण करायच्या उदा. कराओके, जुन्या मित्रांशी संपर्क ठेवणे, पर्यटन व बागकाम यात आनंद घेणे तसेच समाजासाठी काही उपयुक्त गोष्टी करणे इत्यादी. घरात माझे वडील ८८ वर्षांचे आहेत, आई ८० वर्षांची आहे. त्याचबरोबर माझे सासरेही माझ्याकडे आहेत. त्यांचे वय ८४ आहे. त्यांच्याबरोबर असल्यामुळे त्यांच्या गरजा पूर्ण करणे, औषधे घरी आणून देणे, गप्पागोष्टी करणे यामध्ये माझ्यापेक्षा जास्त वाटा माझ्या पत्नीचा आहे. हे करत असताना फेसबुकवर माया केअर ची माहिती मिळाली. ज्योती मॅडमशी संपर्क झाला व मंजिरी मॅडमशी ऑनलाईन मुलाखत झाल्यानंतर कोल्हापूर येथे माया केअर फाऊंडेशन चे रोपटे लावले गेले.

आव्हान फार मोठे होते पण वेळोवेळी ज्योती मॅडम बरोबर संपर्कात असल्यामुळे स्वयंसेवक वाढत गेले. सुरुवातीला मी व शशिकांत कुलकर्णी कोल्हापुरातील बागेमध्ये जाऊन माया केअरची माहीती व पत्रके देऊ लागलो. त्यानंतर मी कोल्हापुरातील ज्येष्ठ नागरीक संघांना भेटी देऊन (उदा.कोल्हापूर NRI ज्येष्ठ-नागरीक संघ, तपोवन, साने गुरुजी वसाहत) येथे माया केअरच्या माहीतीचे सादरीकरण करु लागलो व मास्कचे वितरणही केले, मग कोल्हापुरातील मातोश्री वृध्दाश्रम, सावली केअर सेंटर, सुखावा, स्नेहबंध यांच्याशी भेट देऊन माया केअरची माहिती दिली. फेब्रुवारी महिन्यात अनंत घुगरे, चिंचपोकळी मुंबई यांचा मला फोन आला मी कोल्हापूर मध्ये येत आहे व मला तुमची मदत हवी आहे. घुगरेंना रिसीव्ह करायला मी रेल्वे स्टेशनवरही गेलो व त्यांच्याबरोबर दोन दिवस स्नेहबंध व मातोश्रीला भेट पण दिली. कोरोनाचे प्रमाण कोल्हापूर मध्ये फार वाढले होते. त्यामुळे काम करायची इच्छा असताना सुध्दा बाहेर पडता येत नव्हते UK मधून प्रीती पाटील यांचे वडील आयरेकर साने गुरुजी वसाहतीत राहत आहेत, त्यांच्या पत्नीचे २० मार्चला निधन झाले. त्यांची मुलगी UK व मुलगा USA मध्ये असतो, आयरेकरांना डोळ्यांनी दिसत नाही व ते केअर टेकर सोबत घरात राहतात त्यांच्याबरोबर माझा फोनवरुन बराच वेळ संपर्क असतो. ३ ऑगस्टला मी कोल्हापूर ग्रुपची मिटींग आयोजित केली त्यामध्ये अभिषेक यादव, तन्वी भोपे, अजय बिरादार, अमित पाटील, शशिकांत कुलकर्णी असे एकुण ९ जण एकत्र आलो व एकमेकांची ओळख करुन घेतली. सावली केअर, मायासावली मोरेवाडी व नाळे कॉलनीतील लोकांच्या लसीकरण, रजिस्टेशन स्लॉट बुकिंग, प्रत्यक्ष प्राथमिक केंद्र मोरेमाने नगर मध्ये मदत केली. यामध्ये सावली केअर सेंटरच्या सौरभ शेवाळे यांचे फार मोलाचे सहकार्य मिळाले. सौ.व श्री.किशोर देशपांडे यांनी मोलाचे सहकार्य केले, सावली केअरच्या व्हॅक्सीनेशनसाठी माया केअरचे पत्र घेऊन आयुक्तांच्याकडे पाठ पुरावाही केला. माया केअर फाऊंडेशन व सावली केअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जादुगार यांचे प्रत्यक्ष जादुचे प्रयोग व कराओकेचा कार्यक्रम छान झाला. आम्हाला माया केअरच्या सादरीकरणासाठी स्टँड हवा होता व ही गोष्ट कोल्हापूर येथील अभिषेक यादव यांनी फेसबुकवर पोस्ट केली त्यामुळे कोल्हापूरमधील देसाई या व्यक्तीने माया केअर फाऊंडेशनसाठी ती विनामूल्य भेट दिली, रविवारी सकाळी मी अभिषेक यादव, तनवी भोपे, अजय बिरादार स्टँड व पत्रके घेऊन रुईकर कॉलनी, कळंबा तलाव येथे जाऊन सकाळी ७ ते ९ या वेळात फाऊंडेशनची माहिती दिली. यावर्षी आपल्या फाऊंडेशनने, ज्येष्ठ नागरिकांच्या घरी गणपती पोहोचविण्याचा संकल्प केला, त्यासाठी मी साने गुरुजी वसाहतीतील नरसिंह जमदग्नी काका जे डोळ्याने अंध आहेत, व सदाशिव अनिखिंडी त्यांच्या पत्नीचे ५ वर्षापूर्वी निधन झाले, ते एकटेच राहतात.त्या दोघांचाही घरी जाऊन गणेश मुर्ती पोहोच करुन आलो. मला वेळोवेळी ज्योती मॅडम, विद्याधर जोशी, माधुरी खराटे बुलढाणा, अभिजीत माळी व तसेच मंजिरी गोखले, जोशी मॅडम यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळते. हे काम करत असताना मनाला फार मोठे समाधान मिळते. आमची कोल्हापूरची टीम अतिशय छान व उत्तम काम करीत आहे.
जगात भारी आम्ही कोल्हापुरी.



आमचे स्वयंसेवक विद्याधर जोशी आमच्या संस्थेचे लाभार्थी श्री.सुधाकर कुलकर्णी जे १००% अंध आहेत त्यांना लसीकरणासाठी मदत करताना.



आमचे स्वयंसेवक मकरंद निमोणकर कै.शरद फडणीस यांच्याबरोबर फेरफटका मारताना.



आमचे स्वयंसेवक दिलीप उपासनी आमच्या संस्थेचे लाभार्थी श्री.दत्ता टोळ यांचा वाढदिवस साजरा करताना.



आमचे स्वयंसेवक अनिल नातू आमच्या संस्थेचे लाभार्थी श्री.माधव पारधी यांचा १०० वा वाढदिवस साजरा करताना.





आमचे स्वयंसेवक इम्तियाज रियाज हकीम
स्नेहबंध केअर सेंटर, सांगली येथे
वृध्दांशी वार्तालाप करताना

आमचे स्वयंसेवक संजय कुलकर्णी
कोल्हापूर येथील श्री.सदाशिव अनिखिंडी
यांच्या घरी गणेशमुर्ती आणून देताना.






आमच्या स्वयंसेविका सौ.माणिक वैशंपायन ह्या
श्रीमती उषाताई कुंटे (वय ८५ वर्षे) या आजींना
पुस्तक वाचून दाखवित असताना

आमचे स्वयंसेवक भास्कर पवार हे
श्रीमती लंकाबाई चाटे (वय ७० वर्षे व
थोडया मानसिक रुग्ण) यांना पंढरपूर
येथील आश्रमात दाखल करताना

भावनिक / बौद्धिक / औपचारिक / समर्थन साठी वरिष्ठ नागरिकांना मोफत ९० मिनीटांच्या भेटी

**सेवा :**

त्यांना डॉक्टर / रेडियोथेरेपी / लसीकरण / सामाजिक कार्यक्रम
थिएटर / बँक / कागदपत्रे / लेखन / वाचन / खरेदी /
गॅझेट्स वापरुन / व्हिडिओ कॉल करण्यात मदत करा



**१७०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिकांना १०,४०० पेक्षा जास्त सेवा.**

पुणे, मुंबई, कोल्हापुर, नागपुर, नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर
सोलापुर, सांगली, नंदुरबार, बुलढाणा, वर्धा, अमरावती आणि एन.सी.आर.
वडोदरा, अहमदाबाद, आनंद, उदयपुर, गुवाहाटी, चंडीगड, जालंधर,
कोलकाता, हैदराबाद, बैंगळुरु, बेळगाव, चेन्नई, त्रिची

Maya CARE Foundation

**वयोवृद्ध व्यक्तीसाठी सेवेची विनंती करण्यासाठी स्वयंसेवा / देणगी द्या किंवा रोजगार हवा असलेल्या अपंग व्यक्तीची शिफारस करा,**

**9552510400 / 11 वर कॉल करा**

माया केअर मध्ये १०० अपंग लोक कारकिर्द बनवित आहेत.

Email : service@mayacare.org More on www.mayacare.org

* आपले अभिप्राय व सुचना यांचे स्वागत आहे. आपण ई-मेल करुन कळवू शकता.

**देणगीसाठी आयकर सवलत आहे.**

**NAME OF THE BANK : ICICI BANK LIMITED** (BRANCH : TILAK ROAD,PUNE)
**ACCOUNT NO. : 187501000462**
**IFSC CODE : ICIC0001875**

**PRINTED MATTER**
बुक-पोस्ट

**FROM,**

**माया केअर फाऊंडेशन**
१२१४ शुक्रवार पेठ, आफ्रिका हाऊस,
सुभाषनगर, गल्ली नं.०४, पुणे - ४११००२.
केवळ खाजगी वितरणासाठी / विनामूल्य

**TO,**
श्री/श्रीमती ______________________
______________________
______________________
______________________
______________________